तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

परिपत्रक

क्रमांकः२/एनजीसी/शिक्षणशुल्क/२०१६/२०३८

दिनांक : 6 SEP 2016

संदर्भ : श्री. मनोज तलवारे यांचे दि.०४.०७.२०१६ रोजीचे निवेदन.

महाराष्ट्र राज्यातील या संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या काही संस्थांमध्ये सभासदत्वासाठी रू.२५०/- किंवा रु.३००/- प्रतिविद्यार्थी याप्रमाणे शुल्क नियामक प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्काव्यतिरीक्त अधिकचे शुल्क विद्यार्थ्यांकडुन प्रवेशाचे वेळी वसूल केले जात असल्याबाबतचे संदर्भाधीन निवेदन संचालनालयास प्राप्त झाले आहे.

त्याअनुषंगाने या परिपत्रकान्वये असे आदेशित करण्यात येते की, संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक संस्थांनी विद्यार्थ्यांकडुन शुल्क नियामक प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शिक्षणशुल्काव्यतिरीक्त अधिकची कोणत्याही प्रकारची रक्कम वसुल करु नये. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीकोनातुन आवश्यक मासिके/नियतकालिकांकरीताची फि, सर्व विद्यार्थ्यांच्या लेखी सहमतीशिवाय घेण्यात येवू नये. अशाप्रकारे विद्यार्थ्यांकडुन जबरदस्तीने शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काव्यतिरीक्त अन्य कोणत्याही रक्कमेची आकारणी केल्याचे निदर्शनास आल्यास महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी ॲक्ट १९८७ आणि शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. टीईएम-२००४/(५४५/०४)/तांशि-१, दि.११.०१.२००५ मध्ये नमुद मार्गदर्शक तत्वानुसार संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे ज्या संस्थांनी अशाप्रकारे जर कोणतीही अधिकची रक्कम विद्यार्थ्यांकडुन वसूल केली असेल, तर अशी रक्कम सर्व संबंधित विद्यार्थ्यांना तात्काळ परत करण्यात यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

सहसंचालक तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती
५५७३ दिनांक ७/९/१६

प्रत :

१. मा. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१ यांना माहितीकरीता.
२. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांच्या निदर्शनास आणावे.
३. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २अ,१० यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
४. कार्यासन क्र.३ यांना माहिती व संकेतस्थळांवर प्रसिध्दीकरीता.

\\DTENS1\Desk2\Datta\2016\01 Paripatrak.docx

प्र.क्र.: विकाअ/विसंभ/शिक्षणशुल्क/२०१६/3012
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय अमरावती
दिनांक : 12 SEP 2016

सहसंचालक तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, अमरावती.

प्रत :- ① प्राचार्य, सर्व संस्था अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, वरील परिपत्राच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी.

② प्रोग्रामर, तंत्रशिक्षण वि.का. अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.